Rotary
Club of Beed Midtown

# MIRROR

THE MAGIC OF ROTARY

अंक-३ Club No. 27961 RI Year 2024-25 दि. २ सप्टेंबर २०२४



## ॲनामिया बाय-बाय या प्रोजेक्टने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना निरोगीमय केले

चौसाळा आणि पिंपळनेर या गावातील विद्यार्थ्यांमध्ये अशक्तपणा, फिकट त्वचा पडणे, छातीत दुखणे, जलद हृदयाचे ठोके वाढणे, तळहात पाय थंड पडणे, जिभेची जळजळ होणे, वेदना होणे अशा विविध समस्या जाणवल्यानंतर रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन ने चौसाळा आणि पिंपळनेर या ठिकाणच्या विद्यार्थ्यांची तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये ॲनामिया या आजाराचे लक्षणे असू शकतात असे जाणवले. त्यामुळे रोटरी ची सर्व टीम ने ठरवले की, ॲनामिया बाय-बाय हा प्रोजेक्ट घ्यावा त्या दृष्टिकोनातून त्या ठिकाणी विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये जवळपास ४५७ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ४२ विद्यार्थी हे ॲनामियाग्रस्त आहेत हे लक्षात आले. यानंतर रोटरीतर्फे त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्यात आले. तसेच त्यांना फोलिक ॲसिड टॅबलेट उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच पुढील तीन महिन्याची स्टेटमेंट चा योग्य तो सल्ला देऊन तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून त्यांची तपासणी करण्यात आली. या प्रोजेक्टला यशस्वी करण्यासाठी रोटरीयन डॉक्टर चैतन्य कागदे, रोटरीयन प्राध्यापक डॉक्टर अनिता शिंदे मॅडम, रोटरीयन शैलजा चिलवंत मॅडम यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच रोटरीयन डॉ. निलेश जगदाळे, रोटरीयन नितीन गोपन यांनी या प्रोजेक्टसाठी विशेष मेहनत घेऊन हा प्रोजेक्ट यशस्वी केला.



श्रीहरी विद्यालय, वाहेगाव (आम्ला) येथे क्लब च्या वतीने सायकल बँक अंतर्गत ५ सायकलींचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी रो. संजय गुप्ता, रो. सुरेश बुद्धदेव, रो. सर्वज्ञ जोशी व रो.प्रकाश मंत्री. या प्रसंगी रो. संजय गुप्ता यांचे हस्ते स्वातंत्र्य दिनानिमित्त झेंडा वंदन करण्यात आले.



RI President :
Rtn. Stephanie Urichick



District Governor :
Rtn.Dr. Suresh Saboo



Assitant Governor :
Rtn. Ganesh Mule



President
Rtn.Er.Nitin Gopan



Secretary
Rtn.Dr.Nilesh Jagdale



Editor :
Rtn.Balaji Gharat




## विश्वस्त अध्यक्षांचा संदेश
## मार्क डॅनियल मॅलोनी विश्वस्त अध्यक्ष २०२४-२५

ऑगस्ट २०२४ मला आमच्या अनेक रोटरी परपरा आवडतात, विशेषत: आमचे प्रतिक, चाक, जेव्हा जेव्हा मी माझा रोटरी पिन लावतो, नवीन क्लबच्या लोगोची प्रशंसा करतो किंवा स्वयंसेवकाच्या टी-शर्टवर चिन्ह पाहतो तेव्हा मी व्हील दर्शविणाऱ्या शक्यतांद्वारे प्रेरित होतो. रोटरीच्या सुरुवातीच्या काळात, आमच्या पूर्ववर्तींनी याची कल्पना एक गियर म्हणून केली होती, एक मजबूत मशीनचा एक भाग ज्यामुळे महान गोष्टी घडतात. तेच राहते, आणि बरेच काही. माझ्यासाठी, हे आपल्या जगात चांगले करण्याच्या प्रवासातील सायकल आणि हालचालींचे प्रतिक आहे. ऑगस्ट हा रोटरीचा सदस्यत्व आणि न्यू क्लब डेव्हलपमेंट महिना आहे आणि मी तुम्हाला सदस्यत्व आणि द रोटरी फाऊंडेशन यांच्यातील चक्रीय कनेक्शनबद्दल विचार करण्यास प्रोत्साहित करतो. जेव्हा आम्ही डायनॅमिक क्लबमध्ये सदस्यांना गुंतवून ठेवतो, तेव्हा द मॅजिक ऑफ रोटरी घडते.

सदस्य - नवीन आणि अनुभवी दोन्ही - एकमेकांशी आणि त्यांच्या समुदायांप्रती त्यांची बांधिलकी वाढवतात. आणि ती स्थानिक प्रतिबद्धता लक्ष वेधून घेते आणि अधिक सदस्यांना आकर्षित करते. हळुहळू, नवीन सदस्यांना कळते की, त्यांचा क्लब एका शक्तिशाली संस्थेचा भाग आहे. जो जगात चिरस्थायी बदल घडवत आहे. ते फाऊंडेशनबद्दल (पान २ वर)



।। महावीराय नमः ।।
राजेश बंब यांचे
जैन पत्रा & सिमेंट डेपो
नालीदार पत्रे, कलर कोटेड पत्रे, सिमेंट पत्रे, फायबर पत्रे,
सिमेंट, सनला, स्टिल, व पाईपचे होलसेल व रिटेल विक्रेते
Cell. 9225390000
9225380000
TATA SHAKTEE
पत्र्याचा कारखाना
TATA
पत्र्याचे शो-रुम

: पत्ता :
सावतामाळी चौक, मोंढा रोड, बीड - ४३१ १२२

# शिवदरा परिसर वृक्षांनी फुलू लागला..! ८ हजार वृक्षांचे यशस्वी रोपन



रोटरी क्लबने लागवड केलेले सात ते आठ हजार वृक्ष यशस्वी झाले. रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनने शिवदरा या ठिकाणी सीड बॅग वाटप करून बिजारोपण करण्यात आले होते. यामध्ये लिंब, चिंच, कारंग, आंबा, सिताफळ असे विविध वृक्षांची बी लावण्यात आली होती. रोटरी क्लबच्या मेंबरने त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता ह्या बिया जवळपास ९०% खुलून आल्या आहे. आणि चांगल्या प्रकारे वाढ होत आहे. त्याबद्दल परिसरामध्ये नवीन वृक्ष आल्याचा आनंद सर्व नागरिकांना होत आहे. बीजारोपण केलेल्या प्रोजेक्टची स्तुती होत आहे.

(पान १ वरुन)

शिकतात, त्यास समर्थन देतात आणि कदाचित अनुदानासाठी अर्ज करतात. ते स्वत:ला पोलिओ निर्मूलनाच्या चळवळीचा एक भाग म्हणून पाहतात. आमच्या सदस्यांचा अनुभव जसजसा वाढत जातो, तसतशी सर्व स्तरांवर त्यांची रोटरीशी बांधिलकी वाढते. लोक आमचा प्रभाव पाहतात, ज्यामुळे रोटरी अटळ बनते. नवीन सदस्य सामील होतात, नवीन क्लब तयार होतात आणि हे चक्र चालूच राहते. चाकाच्या प्रत्येक वळणाने, आम्ही रोटरी आणि आमची फाऊंडेशन वाढवतो. क्लब आणि आमच्या फाऊंडेशनमधील हे जादुई कनेक्शन उलगडण्याचे असंख्य मार्ग आहेत. उदाहरणार्थ, १००% पॉल हॅरिस फेलो क्लब, जिथे प्रत्येक सदस्य पॉल हॅरिस फेलो असतो, गुंतलेले क्लब थेट फाऊंडेशनशी कसे जोडलेले असतात हे दाखवतात. रोटरी क्लब ऑफ क्रेसेंट (ग्रीन्सबोरो), नॉर्थ कॅरोलिना यांसारखे काही क्लब अगदी आधीपासून आहेत, ज्यांचे १२५ सदस्य एकाच वेळी पॉल हॅरिस फेलो, लाभकर्ते आणि टिकणारे सदस्य आहेत. परंतु फरक करण्यासाठी तुम्हाला अशा ''ट्रिपल क्राउन'' क्लबमध्ये असण्याची गरज नाही. मी सर्व रोटरी सदस्यांना या महिन्याचे ध्येय लक्षात ठेवण्यास सांगत आहे. ज्याला मी मार्कचे मॅजिकल मार्कर म्हणतो आहे. कृपया ३१ ऑगस्टपर्यंत वार्षिक निधीमध्ये योगदान देण्याची वैयक्तिक वचनबद्धता करा. rotary.org/give वर विसरण्यापूर्वी ते आत्ताच करा. तुम्ही तिथे असताना, आवर्ती थेट देणगी सेट करा. तुमच्या मदतीने, आम्ही रोटरी आणि तिच्या फाउंडेशनचे ते महान चाक योग्य दिशेने फिरत ठेवू शकतो, आज आपण कल्पनाही करू शकत नाही त्यापेक्षा मोठ्या उद्याच्या दिशेने वाटचाल करू शकतो.

# रोटरी सुंदर दंत, स्वच्छ दंत आणि आनंदी जीवन या संकल्पनेतून दंत तपासणी शिबीर संपन्न





रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या माध्यमातून बीड शहर आणि ग्रामीण भागामध्ये दंत तपासणी शिबीर घेण्यात आले. लहान मुलांमध्ये विशेषत: दाताचे खूप मोठ्या समस्या जाणवतात. त्यामध्ये दात किडणे, अ जीवनसत्वाचा अभाव, सतत दात दुखणे या गोष्टींमुळे विद्यार्थ्यांमध्ये न्युनगंड व नैराश्य असते म्हणून रोटरीने बीड शहर आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे दंत तपासणी शिबीर विविध भागात आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १५०० विद्यार्थ्यांची तपासणी करून १५० विद्यार्थ्यांवर योग्य ते उपचार करण्यात आले.

या प्रोजेक्टला यशस्वी करण्यासाठी रो. डॉ. धनराज वाघमारे, रो.डॉ. प्रविण ढगे, रो.डॉ.निलेश जगदाळे यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच या प्रोजेक्टसाठी अध्यक्ष रो.नितीन गोपन व सर्व रोटरीयन बहुसंख्येने उपस्थित होते.

स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था...!
जिद्द | ज्ञान | सामर्थ्य (TM)
जिज्ञासा करिअर अकॅडमी, बीड
01 नागरी सेवा परीक्षा
02 राज्यसेवा परीक्षा
03 दुय्यम सेवा परीक्षा
04 गट-क सेवा परीक्षा
05 सरळसेवा परीक्षा
श्री.पारनेरकर महाराज मंदिर शेजारी, गोविंद नगर, माने कॉम्प्लेक्स ते नाट्यगृह रोड, बीड (02442) 221040, 8055221040

## बीड जिल्हा कारागृहात कैद्यांना राखी बांधून रोटरीने केला रक्षाबंधन साजरा



बीड जिल्हा कारागृहातील बंदी व कर्मचारी यांचेकरिता रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन तर्फे कारागृहात रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन, बीड नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत आलेला क्लब असून रक्षाबंधन साजरे करण्यात आले. यामुळे बंधूंच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

यावेळी रो. सौ. अनिता शिंदे, रो.सौ. उषा ढेरे, रो.सौ. संगिता मनसबदार, सौ. वर्षा थोरात, सौ. मनिषा देशमाने, सौ. सोनिका जगदाळे, सौ. गोपन यांनी बंदी बांधवांना राखी बांधली.

यावेळी कारागृह अधीक्षक श्री. शेख साहेब, सुभेदार श्री. चिंचाणे, कारागृह कर्मचारी श्री. टी.एल. पवार व डोईफोडे, रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे अध्यक्ष रो. इंजि. नितीन गोपन, सचिव रो.डॉ. निलेश जगदाळे, रो.डॉ. शिवजी देशमाने, रो.प्रा.नितीन भोसले व कारागृह कर्मचारी उपस्थित होते.

## रोटरीयन समीर काझी यांची राज्यमंत्री दर्जा असणाऱ्या महाराष्ट्र वक्फ बोर्डचे अध्यक्ष म्हणून निवड !



रो. समीर काझी यांची महाराष्ट्र वक्फ बोर्ड महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या मंडळाचा अध्यक्ष म्हणजे राज्यमंत्र्यांचा दर्जा असणारं हे महामंडळ आहे. या महामंडळाच्या माध्यमातून अल्पसंख्यांक, दलित, बहुजन व मागासवर्गाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्याची संधी रो. समीर काझी यांना मिळालेली आहे. रोटरीयन म्हणून समीर काझी यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबवले तसेच आपल्या व्यवसायाने बीड व मराठवाड्यामध्ये त्यांचे नावलौकिक आहे. केवळ तीनच वर्षाच्या कार्यकाळामधून सदस्य ते महामंडळाचे अध्यक्ष पर्यंत त्यांनी मजल मारली आहे. बीड सह संपूर्ण महाराष्ट्र मधून त्यांचं कौतुक होत आहे. एक रोटरीयन म्हणून आम्हा सर्व रोटरीयनला त्यांचा अभिमान आहे. रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करून त्यांना पुढील कार्यकाळास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे अध्यक्ष, सचिव तसेच सर्व सभासद बहुसंख्येने उपस्थित होते.




**मियावॉकी घनदाट जंगलचे काम आज आपले उर्जावान प्रोजेक्ट चेअरमन रो.डॉ.प्रकाश कोंका व रो.बाबासाहेब कुडके यांनी सुरू केले. जेसीबीच्या साह्याने पूर्ण बेड तयार केले. मार्किंग करून वेगवेगळ्या प्रकारचे झाडे लावायची आहेत.**

Mathemagic
Explore world of Maths

# MATHEMAGIC
## By Dolly Jain

* CBSE, ICSE अभ्यासक्रम
* 3rd ते 5th सर्व विषय
* 6th ते 10th गणित
* होमवर्क व परीक्षांविषयी मार्गदर्शन

Follow our
YouTube Channel
*Mathemagic by Dolly Jain*

* कोटा(राजस्थान) येथील नामांकित संस्थांमध्ये शिकवण्याचा अनुभव.
* गणिताचा पाया पक्का करण्यासाठी विशेष लक्ष.

Mob. 8380876963

## कुमशी जिल्हा परिषद शाळेत रोटरीने ध्वजारोहन करून विद्यार्थ्यांना बसण्यासाठी सिमेंट बँचेस वाटप केले.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशी यां ठिकाणी शाळेतील विद्यार्थ्यांना दुपारच्या सुट्ट्यांमध्ये किंवा शाळेत आल्यानंतर बसण्यासाठी कोणतीही व्यवस्था नव्हती. त्यामुळे रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनने या ठिकाणी १५ ऑगस्ट या दिवशी स्वातंत्र्य दिवस साजरा करून या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना सिमेंट बंचेस वाटण्यात आले. यावेळी गावातील सरपंच, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थ, शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. तसेच रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे अध्यक्ष, सचिव, प्रोजेक्ट चेअरमन व सदस्य उपस्थित होते.

### शिका..!

पूजा करायच्या आधी
✲ विश्वास ठेवायला शिका..!
बोलायच्या आधी
✲ ऐकायला शिका..!
खर्च करायच्या आधी
✲ कमवायला शिका...!
लिहायच्या आधी
✲ विचार करायला शिका..!
हार मानण्याआधी
✲ प्रयत्न करायला शिका...!
आणि मरायच्या आधी
✲ जगायला शिका...!

जीवन जगताना संगत ही खुप महत्वाची आहे... आपलं ''वय'' व ''पैसा'' यांच्यावर कधीच गर्व करू नये, कारण ज्या गोष्टी ''मोजल्या'' जातात त्या नक्कीच संपत असतात..!

रो. जनार्दन दहिवाळ

### रोटरी क्लबतर्फे सर्व ॲनेटस्ना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

अर्जुन प्रविण ढगे – ४ सप्टेंबर
हर्ष अनिल कुकडेजा – ५ सप्टेंबर
ओवी अमोल तळेकर– १० सप्टेंबर
रिद्धेश रुपेश मुंदडा – २१ सप्टेंबर
कैफ राजरब्बानी – १४ ऑगस्ट
अनुष्का गणेश मंत्री – १६ सप्टेंबर
कृष्णा किरण सवासे – १७ सप्टेंबर
शर्वरी सर्वज्ञ जोशी – १८ सप्टेंबर
आदित्य अनिल सुत्रे– १९ सप्टेंबर
गरिमा अक्षय भोपळे– २३ सप्टेंबर
प्रतिक हरिष मोटवाणी– २४ सप्टेंबर
सागर गोपाल अग्रवाल – २७ सप्टें.
प्रणव गणेश वाघ – २७ सप्टेंबर
प्रियल प्रविण ढगे – २८ सप्टेंबर

### भावपूर्ण श्रद्धांजली..!



रो.भगीरथजी चरखा इनकी छोटी बेहन सौ. हेमलता घनश्यामजी बियाणी, मालेगाव इनका आज दि. १४ जुलाई २०२४ को स्वर्गवास हुआ है, जिनका चलावा कल १५ जुलै को सवेरे ९ बजे मालेगाव यहाँ होगा। भगवान इन के आत्मा को शांति देवे।



रोटरी क्लबच्या सदस्य असलेल्या रो.अमोल तळेकर यांनी आपले इंजिनिअरिंग शिक्षण आणि पेंटिंगच्या गुणांचा संगम करून त्यांच्या विविध कौशल्याची प्रभावी प्रदर्शन केले आहे. त्यांच्या पेंटिंगसच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या विविध गुणांचे दर्शन करून दिले आहे. ज्यामुळे क्लबच्या अन्य सदस्यांना प्रेरणा मिळू शकते.

### रोटरी क्लबतर्फे सर्व मेंबर्सना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो. सर्वज्ञ जोशी– ३ सप्टेंबर
रो.इंजि.राहुल बोरा– ६ सप्टेंबर
रो.कैलास मैड– ६ सप्टेंबर
रो.डॉ.सौ.शितल भोपळे– ७ सप्टें.
रो.रुपेश मुंदडा – १० सप्टेंबर
रो.उषा ढेरे – १३ सप्टेंबर
रो.डॉ.सोमेश पाळेकर – १७ सप्टें.

### रोटरी क्लबतर्फे सर्व ॲन्स यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

सौ.प्रियंका मंत्री–२६ सप्टें.

### जुलै महिन्यातील १००% उपस्थिती

**या महिन्यातील बक्षीसांचे आयोजक**
**रो.प्रल्हाद कराळे**

रो.इंजि.नितीन गोपन
रो.डॉ.निलेश जगदाळे
रो.भारत शेटे
रो.दिनेश लोळगे
रो.सुरेश बुद्धदेव
रो.प्रल्हाद कराळे
रो.प्रा.राजेंद्र गाडेकर
रो.जनार्दन दहिवाळ
रो.सर्वज्ञ जोशी
रो.अमोल तळेकर
रो.प्रा.नितीन भोसले
रो.बालाजी घरत
रो.अनिल कुकडेजा
रो.बालाप्रसाद वैष्णव
रो.डॉ.प्रकाश कोंका

**मेकअप**

रो.डॉ.सुरेंद्र बजाज
रो.बद्रीनारायण मानधने
रो.जितेंद्र बोरा
रो.संतोष टवाणी

### ऑगस्ट महिन्यातील १००% उपस्थिती

**या महिन्यातील बक्षीसांचे आयोजक**
**रो.अनुराग जैन**

रो.इंजि.नितीन गोपन
रो.डॉ.निलेश जगदाळे
रो.हरिष मोटवाणी
रो.दिनेश लोळगे
रो.सुरेश बुद्धदेव
रो.प्रा.राजेंद्र गाडेकर
रो.सीए.आदेश नहार
रो.जितेंद्र बोरा
रो.जनार्दन दहिवाळ
रो.सर्वज्ञ जोशी
रो.अमोल तळेकर
रो.प्रा.नितीन भोसले
रो.अभिजीत ठाकुर
रो.बाबासाहेब कुडके
रो.अनिल कुकडेजा
रो.माणिक परभणे
रो.डॉ.शिवाजी देशमाने
रो.ॲड.नामदेव साबळे
रो.शेख रब्बानी मुसा
रो.संगिता सपकाळ
रो.संगिता मनसबदार
रो.आशा भारती


स्टॉकिस्ट ॲन्ड डिलर्स
✲कारपेट ✲मॅटींग
✲फोम ✲कुशन ✲क्वायर
✲रेडीमेड पडदे
✲रेक्झीन ✲बेड शिट्स
✲गादी ✲वेलवेट
✲फर्निशिंग ✲वॉलपेपर

सजावट
गृह सजावटीचे भव्य दालन
मुनोत कॉम्प्लेक्स, पुना गाडगीळच्या खाली,
सुभाष रोड, बीड – ४३१ १२२

रौप्य महोत्सवी वर्षात यशस्वी पदार्पण...
चंद्रप्रकाश सेठी
मो. 7588 85 85 85
9511 809 409